भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३०८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०६/२०१८

**१) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/०६/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा आपल्या आईला म्हणाला की राशन कार्ड बनवायचे असल्याने मला घर टॅक्स पावती दे? त्यावर आईने घर टॅक्स पावती देण्यास नाकारल्याने फिर्यादी हा आपल्या आईवर चिडुन तिला वाईट शब्दात शिवीगाळ केली त्यावर आरोपीने फिर्यादीस जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिली तेव्हा फिर्यादीने आरोपीस म्हटले की माझ्या व आईच्या मध्ये तु येवु नकोस असे म्हटले असता आरोपीने खाली पडलेली विट पकडून फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केले त्यास जखमी अवस्थेत ग्रामीण रुग्नालय लाखांदुर येथे भरती केले असे जखमी फिर्यादींचे बयानावरुन व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथें कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत

**२) विवाहीतेला शारीरिक व मानसिक रित्या पिळवणुक केली व अपमानात्मक वागणुक दिल्याने गुन्हा नोंद :—**

सन १९९७ ते दिनांक १६/०६/२०१८ पर्यत यातील फिर्यादी ही यातील आरोपीची पत्नी असुन दिनांक २६/०५/१९९५ रोजी रिती विघीवत बौध्द धर्मातील प्रचलीत रिवाज परम्परे नुसार लग्न झालें आहे. आरोपी हा संशयीत वृत्ती मुळे फिर्यादीचे चारित्र्यावर नेहमी संशय घेत आरोपीने फिर्यादीस सोडचिट्ठी न देता देखील फिर्यादीस माहीत होवु न देता बेकायदेशीर रित्या दुसरे लग्न कले फिर्यादीला लग्न झाले पासुन आज पर्यत अपमानात्मक वागणुक देत मारझोड व शिवीगाळ करुन मानसिक व शारीरिक रित्या पिळवणुक केली फिर्यादीस हक्काचे घरातुन हाकलुन लावले व तिच्या मुलांपासुन जानीव पुर्वक दुर करुन मानसिक स्वास्थ खचन्यास कारणीभुत फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४९८(अ),४९४,३२३,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत

**३) मोटार सायकलची चोरी :—**

दिनांक १६/०६/२०१८ चे ०३.३० ते ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी तुशार वासुदेवराव लोखंडे वय ४४ वर्ष, रा. पोलीस कॉलोनी माकडे नगर तकीया वार्ड भंडारा यानी आपली मोपेड सुझुकी यासेस पांढऱ्या रंगाची क्र. एमएच ३६ वाय ०७५२ किंमती ६०,०००/—रु. ची आ.ओ प्लॉट भंडारा समोर ऊभी करुन काम करण्यास गेला असता काम करुन परत आल्यावर ठेवलेल्या ठिकाणी फिर्यादीची गाडी दिसली नाही कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी :—**

दिनांक १५/०६/२०१८ चे ०६.०० ते १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सचिन जनार्धन जांभुळकर वय ३३ वर्ष, रा. रजनी नगर खात रोड भंडारा यानी आपली होंडा कंम्पनीची टयुटर्स लाल रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ३१ डीजे ०९१३ किमंती पार्कीग समोर ऊभी करुन नागपुर येथे गेला असता परत आल्यावर ठेवलेल्या ठिकाणी फिर्यादीची गाडी दिसली नाही कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन गाडीचे काचेवर दगड मारुन काच फोडुन व डोक्यावर दुखापत केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १५/०६/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी नितीन रामनारायण गुप्ता वय ३८ वर्ष, प्रगती कॉलोनी सेंदुरवाफा रेनाल्ट कंम्पनीची ४ चाकी नविन टेक्चर गाडी घेवुन टोल नाक्याकडुन सेंदुरवाफा येत असतांनी यातील अज्ञात २ ईसमांनी मोटार सायकल ने येवुन माझे मोटार सायकल डॅस का दिली म्हणुन यातील आरोपीतांनी वाहनाचे काचेवर दगड मारुन काच फिर्यादीचे डोक्यावर लागुन दुखापत होवुन गाडीचे काच फुटुन नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,४२७,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

६) संगनमत करुन शेतीच्या वादावरुन डोक्यावर काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १६/०६/२०१८ चे १०.१५ ते १०.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन शेतीच्या वादावरुन शिवीगाळ करुन फिर्यादीचे डोक्यावर काठीने मारुन जखमी केल्याने फिर्यादी ओमप्रकाश काशिराम वाघमारे वय ५८ वर्ष, रा. चिखली यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४,५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

७) मोटार सायकलच्या धडकेत इसमाचा मृत्यु व एकास गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १६/०६/२०१८ चे १०.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी संदीप गुलाब धार्मीक वय २२ वर्ष, रा. आंधळगाव याचा वडील गुलाब रामाजी धार्मीक वय ५० वर्ष, हा आपले मोटार सायकल क्र. एमएच ३६ टी १२८६ ने डब्बलसिट आंधळगाव वरुन भंडारा कडे जात असतांनी डोंगरगाव चौकात भिकारखेडा गावाकडुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, लापरवाहीने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे वडीलाचे मरणास व भाऊ नवनित धार्मीक वय ३० वर्ष, यास गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. म्हैसकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

८) क्षुल्लक कारणावरुन सागवनाच्या काठीने मारुन जखमी केले :–

दिनांक १६/०६/२०१८ चे १६.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा शेतावर जात असतांना आरोपीने फिर्यादीस पाहुन आपले शेतातुन फिर्यादी जवळ जावुन मागील वर्षी तु माझ्या पत्नीला बोरिंगवर मारहान केली होती असे म्हणुन हातातील सागवनाच्या काठीने फिर्यादीचे डावे मनगटावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

९) रेल्वे लाईन मृत अवस्थेत तरुण मिळुन आला. :–

दिनांक १६ /०६/२०१८ चे ११.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी के. एस. रामटेके मुख्य रेल्वे स्टेशन प्रबंधक भंडारा यांनी माहीती दिली की, यातील मृतक करमसिंग लक्ष्मीसिंग जगत वय १८ वर्ष, रा. बछली जि. बिलासपुर रा. छत्तीसगड हा डाऊन रेल्वे लाईन खात ते भंडारा रोड मध्ये कि. मी १०७३/१२३० चे मधात मृत पडुन आहे तरी कार्यवाही करण्या करीता मेमो पाठविल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. वैद्य यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भाजीपाले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

१०) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १६/०६/२०१८ चे १८.१० ते १९.१० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील महिन्द्रा मॅक्स वाहन जुना बस स्टॉप तुमसर येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभी करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. पुडके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. पुडके पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

११) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १५/०६/२०१८ चे १७.०० ते १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनीडोअर वाहन पेट्रोलपंप ठाणा बस स्टॉप समोर जवाहरनगरकडे जाणारा रोड येथे सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पोलीस स्टेशन जवाहरनगर करीत आहेत.

**१२) अवैध हातभट्टी व देशी दारु अडड्यांवर धाडी .   :–**

दिनांक १६/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, लाखनी व  पालांदुर येथे हातभट्टी व देशी दारु अड्डयावर धाडी घालुन ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५ लिटर किंमती ५००/–रु. तसेच १४ लिटर ४० मिली लिटर देशी दारु किंमती ४,९८०–रु. असा एकुण ५४८०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१३ ) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १६/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनाकरीता– ०७ ईतर वाहनांवरती – ८५ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.